# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि.२२ मार्च २०२५

जळगाव दि. २२ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र स्टेट कौशल्य विकास सोसायटी यांच्यात आज दि. २२ मार्च रोजी प्र-कुलगुरु प्रा. एस. टी.इंगळे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

महाराष्ट्र स्टेट कौशल्य विकास सोसायटी ही महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभागांतर्गत कार्यरत आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा सोबत केलेल्या या सामंजस्य करारामुळे अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील. कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी सोसायटीच्या माध्यमातून प्रयत्न होतील. या सामंजस्य कराराचा उद्देश राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये वर्णन केलेल्या कौशल्य घटकांचा लाभ घेणे तसेच कौशल्य रोजगार क्षमता वाढविण्यासाठी कौशल्य विकासाचे अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे असा आहे. या करारामुळे विविध कौशल्य अभ्यासक्रमांसाठी योग्य प्रमाणात क्रेडीटस चे वाटप तसेच ॲकॅडेमीक बँक ऑफ क्रेडीट मध्ये क्रेडीटसचे हस्तांतरण केले जाईल. पाच वर्षांसाठी हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराच्या वेळी सोसायटीचे प्रतिनिधी मनोज महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲङ अमोल पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, नवसंशोधन, नवोपक्रम व साहयर्च मंडळाचे संचालक डॉ.राजेश जावळेकर, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील उपस्थित होते.

## बातमी क्रमांक २

जळगाव दि. २२ ( प्रतिनिधी) : बँक ऑफ बडोदा तर्फे पुरस्कृत मेधावी छात्र सन्मान पुरस्कार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेतील एम.ए. हिंदी विभागात प्रथ्म आल्याबद्दल गौरव खराटे यास तर व्दितीय पुरस्कार अंजना थैल या विद्यार्थिनीस प्राप्त झाला.

दरवर्षी हे पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्काराचे स्वरुप प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रुपये ११ अकरा हजार तर व्दितीय येणाऱ्यास रुपये ७ हजार पाचशे रुपये असे आहे. सन २०२३-२४ चे पुरस्कार

प्रथ्म आल्याबद्दल गौरव खराटे यास तर व्दितीय पुरस्कार अंजना थैल या विद्यार्थिनीस देण्यात आले. सदर प्रशाळेचा हिंदी विभाग व बँक ऑफ बडोदा यांच्या संयुक्त् विद्यमाने राष्ट्रीयस्तरावरील निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेत प्रथम विजेता नितीश राजकपुर (आर्य पी पी कॉलेज पानीपत), व्दितीय करिश्मा छंगानी (जी.एस.महाविद्यालय, खामगाव) तर तृतीय विजेती सायमा सय्यद (एसएसएमएम महाविद्यालय, पाचोरा) यांनी प्राप्त केला. या स्पर्धेत ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यास्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ.मधुकर खराटे, डॉ.उषा शर्मा व ॲड विलास मोरे यांनी काम पाहिले. तसेच स्वरचित हिंदी काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक चेतन हिरे (एसएसएमएम महाविद्यालय, पाचोरा) व्दितीय क्रमांक नेहा परदेशी (भाषा अभ्यास प्रशाळा, कबचौउमवि) तर तृतीय क्रमांक कृपा पाटील (संख्याशास्त्र विभाग, कबचौउमवि) हिने प्राप्त केला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शशिकांत हिंगोणेकर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशाळा संचालक प्रा.म.सु. पगारे हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन स्नेहा गायकवाड तर आभार डॉ.प्रिती सोनी यांनी मानले. यावेळी प्रशाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी